पुढारी

# के. के. वाघ शिक्षण संस्था : ज्ञानसाधनेची यशस्वी ५५ वर्षे

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी के. के. वाघ शिक्षण संस्थेची १९७० मध्ये स्थापना केली. बहुजन समाजाच्या मुलांनी शिकून रोजगार मिळवावा, समाजाची भौतिक, सामाजिक, बौद्धिक गरज पूर्ण व्हावी व समृद्ध समाज निर्माण व्हावा, हे स्थापनेमागे ठळक धोरण होते. सध्या संस्थेद्वारा २९ विविध महाविद्यालये, तंत्रनिकेतन, शाळा कार्यान्वित असून २३,००० विद्यार्थी व १,९०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संस्थेत कार्यरत आहेत. अर्थात केजी ते पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण देणारी संस्था होय. संस्थेने २०१९-२० हे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले आहे. गुणवत्ता व विद्यार्थी विकास केंद्रीय शिक्षणावर भर देणारी शिक्षण संस्था म्हणून नावारूपास आली आहे.

सन १९७० मध्ये स्थापन झालेल्या रोपट्याचे आज ज्ञानरूपी वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. गेल्या ५५ वर्षांच्या कालावधीत संस्थेने अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षणाच्या विकासावर लक्ष केंद्रित करून अभियांत्रिकी, तंत्रशिक्षण व कृषी शिक्षणात महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवर नावलौकिक प्राप्त केलेला आहे.



त्यासाठी संस्थेचे दिवंगत अध्यक्ष व प्रेरणस्थान आदरणीय कै. बाळासाहेब देवराम वाघ यांनी संस्था स्थापनेपासून विश्वस्त, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्षे संस्था यशस्वीपणे उभी केली. संस्था उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), नवी दिल्ली यांचेकडून ऑटोनॉमस अर्थात 'स्वायत्त' महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाला आहे. तसेच राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद, बंगळुरू (नॅक) यांच्याकडून 'अ' श्रेणी दर्जा प्राप्त आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तरावरील -ICTE - CII सर्वेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास चार वेळा 'सर्वोत्कृष्ट दर्जा'ने सन्मानित करण्यात आलेले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आयडिया लॅबसाठी अनुदान मिळवणारे के. के. वाघ हे सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय होय. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आजमितीस अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या

**समीर बाळासाहेब वाघ**
अध्यक्ष, के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

सात विभागांना एन.बी.ए मानांकन मिळाले आहे. यामध्ये कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक, सिव्हिल आणि एमसीए या विभागांचा समावेश आहे.

वाघ तंत्रनिकेतन, नाशिकच्या सहा विभागांना एनबीए मानंकन प्राप्त आहे. कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, केमिकल, सिव्हिल इंजिनिअरिंग सोबतच आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग अशा विविध शाखांमध्ये डिप्लोमा प्रदान करणारे तंत्रनिकेतन आहे. याशिवाय 'अ‍ॅडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी' हा औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असणारा कोर्सही उपलब्ध आहे.

संस्थेने कृषी शिक्षणाच्या क्षेत्रातही कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन व उद्यानविद्या महाविद्यालय अशी सहा महाविद्यालये कार्यरत आहेत. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी नंतर सर्वाधिक अभ्यासक्रम चालविणारी संस्था म्हणून नावलौकिक आहे. विशेष म्हणजे के. के. वाघ कृषी महाविद्यालयाने 'नॅक'चे मानांकन प्राप्त करून अ‍ॅक्रेडेशनचा मानाचा तुरा खोवला आहे. त्याचप्रमाणे के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने 'नॅक' मानांकन प्राप्त केलेले आहे. मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे, गुरुकूल, बँकिंग, व्यायामशाळा, कॅन्टीन, ग्राहक भांडार, पार्किंग, बसव्यवस्था, सुरक्षा विभाग आदी सुविधा महाविद्यालये, तंत्रनिकेतन व शाळा येथे उपलब्ध आहेत. नाशिक शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे या हेतूने निफाड परिसरातील पंचक्रोशीतल्या गावांना उच्चशिक्षणाची सुविधा पुरविण्यासाठी संस्थेने भाऊसाहेबनगर, काकासाहेबनगर, पिंपळस व चांदोरी येथे वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांची स्थापना केली असून, यातून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी म्हणून कर्मवीर काकासाहेब वाघ व्याख्यानमालेंतर्गत ७५ पुष्पे नाशिक शहराच्या विविध कलादालनांमध्ये गुंफण्यात आले. त्याचप्रमाणे आदरणीय कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आजमितीस १९ पुष्पे गुंफण्यात आली. संस्थेतर्फे दरवर्षी इकोफ्रेंडली गणेशा अर्थात शाडूमाती कार्यशाळेचे आयोजन केले जाते. यंदा शाडूमाती कार्यशाळेत नाशिक जिल्ह्यातील २८०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत गणेशमूर्ती साकारल्या. के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल मार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध मल्टिनॅशनल उद्योग समूहातर्फे कॅम्पस ड्राइव्ह पार पडले. यामध्ये एकूण ६५० हून अधिक विद्यार्थ्यांना नोकरीची सुवर्णसंधी मिळाली आहे. यात सर्वाधिक २२ लाख रुपयांपर्यंतचे पॅकेज, तर सरासरी ४.५० लाख रुपयांचे पॅकेजचा समावेश आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, सिव्हिल व केमिकल या विभागांत विद्यार्थ्यांना कोअर बँचेसमध्ये १०० टक्के नोकरीची संधी मिळाली. अशा तऱ्हेने विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाबरोबरच विद्यार्थिकेंद्रित विकासावर भर देत रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारी नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था म्हणून वाटचाल करत आहेत.


Powered by: erelego.com